**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांक:28.12.2025** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

**- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज कर्नाटकातील आयएनएस कदंब नौदल तळाला भेट देणार.**
**- नवी दिल्लीत सुरू असलेल्या पाचव्या सचिव परिषदेची आज सांगता.**
**- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 'मन की बात' मधून देशवासीयांशी संवाद साधणार.**
**आणि**
**- म्यानमामध्ये आज सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू.**

**आता सविस्तर बातम्या**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज उत्तर कर्नाटकातील कारवार येथील आयएनएस कदंब नौदल तळाला भेट देणार आहेत. त्या गोवाहून विमानाने कारवार नौदल तळावर पोहोचणार आहेत. त्यानंतर राष्ट्रपती कारवार बंदरातून पाणबुडीतून प्रवास करतील. 2006 मध्ये विशाखापट्टणम येथे नौदलाच्या पाणबुडीतून प्रवास केलेले माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यानंतर पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या त्या दुसऱ्या राष्ट्रपती असतील.

**सचिवपरिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत मुख्य सचिवांची पाचवी राष्ट्रीय परिषद सुरू आहे. तीन दिवसीय ही परिषद शुक्रवारी सुरू झाली असून राष्ट्रीय विकासाच्या प्राधान्यक्रमांवर सातत्यपूर्ण संवादाद्वारे केंद्र आणि राज्य भागीदारी मजबूत करणे हा याचा उद्देश आहे. ही परिषद 'विकसित भारतासाठी मानवी भांडवल' या संकल्पनेवर केंद्रित असून यामध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून अवलंबल्या जाणाऱ्या सर्वोत्तम पद्धती आणि धोरणांचा समावेश आहे. या संकल्पनेअंतर्गत बालपणीचे शिक्षण, शालेय शिक्षण, कौशल्य विकास, उच्च शिक्षण, क्रीडा आणि अतिरिक्त अभ्यासक्रम उपक्रम या पाच प्रमुख क्षेत्रांवर भर दिला जात आहे.

या परिषदेत सहा विशेष सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. यानुसार राज्यांमधील नियमनमुक्ती; प्रशासनातील तंत्रज्ञान - संधी, धोके आणि निवारण; स्मार्ट पुरवठा साखळी आणि बाजारपेठ जोडणीसाठी ॲग्रीस्टॅक; एक राज्य, एक जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ; आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी आणि डाव्या विचारसरणीच्या मुद्द्यावर भविष्यासाठी धोरणे निश्चित करणे यावर भर दिला जात आहे. या परिषदेत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि क्षेत्रातील तज्ञ सहभागी झाले आहेत.

**<u>शिवराजसिंह</u>**

काँग्रेस पक्षाने केवळ निवडणुकीच्या फायद्यासाठी 2005 च्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यात महात्मा गांधी यांचे नाव समाविष्ट केले होते तसेच ते  काँग्रेससाठी भ्रष्टाचाराचे मोठे साधन होते अशी टीका केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली आहे. समाज माध्यमांवर प्रतिक्रिया देताना  चौहान म्हणाले की, काँग्रेस पक्षाने मनरेगासाठी असलेला आर्थिक निधी वारंवार कमी केला.  तर 'विकसित भारत: ग्राम योजना' अंतर्गतचे निर्णय दिल्लीत नव्हे, तर गावपातळीवर घेतले जातील, असं सांगताना ग्रामपंचायती एकत्र बसून स्वतःच्या विकासाच्या योजना तयार करतील, असे चौहान यांनी म्हटलं आहे. या योजनेअंतर्गत रोजगार कमी करण्यात आलेला नाही तसंच हमी दिलेल्या कामाच्या दिवसांची संख्या १०० वरून १२५ दिवसांपर्यंत वाढवणे, बेरोजगार भत्ता , ग्रामसभा आणि पंचायतींना मजबूत अधिकार, सामाजिक लेखापरीक्षण , महिला बचत गटांचा सहभाग , मागासलेल्या पंचायतींना अधिक निधी, वेळेवर पगार शाश्वत उत्पन्न निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं असल्याचंही चौहान यांनी म्हटलं आहे.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून देश-विदेशातील जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा 129 वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शनवर, एआयआर न्यूजच्या संकेतस्थळावर आणि न्यूजनएअर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. तसेच, तो एआयआर न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय आणि माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित केला जाईल. या कार्यक्रमाच्या प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये या कार्यक्रमाचे प्रसारण करण्यात येणार आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>वर्षाअखेर-पायाभूत-सुविधा</u>**

२०२५ हे वर्ष भारताच्या विकास प्रवासातील एक निर्णायक अध्याय म्हणून ओळखलं जातं. या वर्षात धोरणांचं प्रगतीत आणि आकांक्षांचं निष्कर्षांमध्ये रूपांतर झालं. 'सुधारणांचे वर्ष' या विशेष मालिकेत, आज २०२५ मधील पायाभूत सुविधा क्षेत्रात भारतानं केलेल्या प्रगतीचा एक अहवाल माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून...

**<u>स्क्रीप्ट</u>**

२०२५ या वर्षात भारतातील रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी आणि डिजिटल अशा पायाभूत सुविधांच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तनकारी प्रगती झाली आहे. पायाभूत सुविधांसाठी सरकारचा भांडवली गुंतवणुकीचा खर्च २०२५-२६ मध्ये अकरा लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. रेल्वेच्या बाबतीत भारताचा पहिला उभा उचलला जाणारा, तमिळनाडुतील पंबन हा सागरी पूल, अभियांत्रिकी उत्कृष्टतेचं एक कालातीत प्रतीक आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे जोड प्रकल्पांतर्गत चिनाब पुलाचं उद्घाटन. प्रथमच, मिझोरम देशाच्या राष्ट्रीय रेल्वे जाळ्याशी जोडलं गेलं. देशातील मेट्रो जाळं एक हजार किलोमीटरपेक्षा जास्त झालं आहे, भारतात आज जगातील तिसरी सर्वात मोठी मेट्रो प्रणाली आहे. विमानतळांची संख्या आता १६३ झाली आहे. ही जगातील तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक व्यवस्था आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्याची लांबी एक लाख ४६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त झाली. या घडामोडींनी २०२५ मध्ये पायाभूत सुविधांनी आर्थिक विस्तार आणि राष्ट्रीय एकात्मतेला अधिक बळकटी दिली आहे.

**<u>214कोटी</u>**

महाराष्ट्रातील नाशिक येथे 2027 मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आणि शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी द्वारका चौकाच्या सुधारणेकरता 214 कोटी रुपयांच्या तरतूदीसह प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल समाज माध्यमावरुन याबाबत माहिती दिली. या प्रकल्पामुळे नाशिक शहरातील वाहतूक सुरळीत होईल. मालवाहतूक तसंच सार्वजनिक वाहतूकीची कार्यक्षमता वाढण्यास मदत मिळेल असा विश्वास गडकरींनी व्यक्त केला.

**लष्कर**
भारतीय लष्कराने पाकिस्तानी दहशतवाद्यांविरुद्ध जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड आणि डोडा जिल्ह्यांमध्ये तीव्र कारवाई सुरू केली आहे. सध्या ३० ते ३५ पाकिस्तानी दहशतवादी जम्मू भागात लपून बसले आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी उंच आणि बर्फाच्छादित भागांपर्यंत वाढवली असल्याचं संरक्षण दलांनी म्हटलं आहे.

**म्यानमार मतदान**
म्यानमारमध्ये आज सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू आहे. 2021 मध्ये लष्कराने नोबेल पारितोषिक विजेत्या आंग सान सू की यांचे सरकार उलथून टाकल्यानंतर पाच वर्षांतील ही पहिलीच निवडणूक आहे. मतदानाचा दुसरा टप्पा 11 जानेवारीला आणि तिसरा टप्पा 25 जानेवारीला होईल. आज देशातील 330 पैकी 102 शहरांमध्ये मतदान होणार आहे. तथापि, 56 शहरांमधील मतदान रद्द करण्यात आलं आहे.

**ट्रम्प झेलेन्स्की भेट**
रशिया आणि युक्रेनमधील वाढता तणाव आणि या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या अमेरिकेच्या सुरू असलेल्या प्रयत्नांदरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदोमिर झेलेन्स्की आज फ्लोरिडामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. ते २०-सूत्री शांतता योजना आणि संभाव्य अमेरिकन सुरक्षा हमींवर चर्चा करतील. दरम्यान झेलेन्स्की यांनी काल कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, कार्नी यांनी युक्रेनसाठी १ पूर्णांक ८२ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या नवीन आर्थिक मदतीची घोषणा केली. दरम्यान, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी कीवमध्ये तत्परतेचा अभाव असल्याची टीका केली. जर युक्रेन वाटाघाटींद्वारे संघर्ष सोडवण्यास तयार नसेल, तर रशिया बळाचा वापर करून आपले उद्दिष्ट साध्य करत राहील असंही पुतीन यांनी म्हटलं आहे.

**इरास्त्राएल**
इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी आपला देश अमेरिका, इस्त्रायल आणि युरोपसोबत युद्धरतच असल्याचं म्हटलं आहे. पेझेश्कियान म्हणाले की इराणविरुद्ध पश्चिमेचे

युद्ध 1980 ते 1988 च्या इराकसोबतच्या युद्धापेक्षा "अधिक गुंतागुंतीचे आणि कठीण" आहे, यामध्ये दोन्ही बाजूंनी 10 लाखांहून अधिक लोक मारले गेले होते.

**चीननिर्बंध**

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने तैवानला शस्त्रविक्री केल्याबद्दल १० व्यक्ती आणि २० अमेरिकन संरक्षण कंपन्यांवर निर्बंध जाहीर केले आहेत. याच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींना चीनमध्ये प्रवेश करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. अमेरिकेने चीनच्या या कृतीवर तीव्र आक्षेप घेतला आहे. गेल्या आठवड्यात अमेरिकेने तैवानला ११ पूर्णांक १ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रविक्रीची घोषणा केल्यानंतर हे निर्बंध घालण्यात आले आहेत.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि श्रीलंका यांच्यातील चौथा वीस षटकांचा सामना आज तिरुवनंतपुरम येथील ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत यजमान भारताने ३-० अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज दिल्ली, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड उत्तर प्रदेश, बिहार, पूर्व मध्य प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबादमध्ये दिवसभर दाट धुक्याची स्थिती राहील असं म्हटलं आहे. तर ओडिशा, सिक्कीम, उत्तराखंड, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातही अशीच परिस्थिती राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज कर्नाटकातील आयएनएस कदंब नौदल तळाला भेट देणार.**

**- नवी दिल्लीत सुरू असलेल्या पाचव्या सचिव परिषदेची आज सांगता.**

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 'मन की बात' मधून देशवासीयांशी संवाद साधणार.**

**आणि**

**- म्यानमामध्ये आज सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू.**

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**